Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 15 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १५ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर आहेत. मुंबई इथं नौदलातल्या आयएनएस सूरत, आयएनएस नीलगिरी आणि आयएनएस वागशीर या तीन लढाऊ जहाजांचं जलावतरण त्यांच्या उपस्थितीत आज होणार आहे. नवी मुंबईत खारघर इथल्या श्री श्री राधा मदनमोहनजी या इस्कॉन मंदिराचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

नौदलाच्या क्षमतांचा विचार करता पंधरा जानेवारी हा दिवस विशेष दिवस ठरेल, असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या एका संदेशात म्हटलं आहे.या तीन अग्रणी युद्धनौकांचा नौदलात समावेश झाल्यामुळे संरक्षण क्षेत्रात जगात अग्रणी राहण्याच्या तसंच आत्मनिर्भर होण्याच्या आपल्या प्रयत्नांना बळकटी मिळणार असल्याचं पंतप्रधानांनी या संदेशात म्हटलं आहे.

****

आज सत्त्याहत्तरावा भारतीय लष्कर दिन साजरा केला जात आहे. फील्ड मार्शल के. एम. करिअप्पा यांनी जनरल फ्रान्सिस रॉय बुचर यांच्याकडून १५ जानेवारी १९४९या दिवशी भारतीय लष्कराचे पहिले कमांडर-इन-चीफ म्हणून कार्यभार स्वीकारल्याबद्दल हा साजरा केला जातो.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दिनानिमित्त लष्कराला शुभेच्छा दिल्या असून, लष्कराच्या अमूल्य त्यागाबद्दल देश लष्कराचा कृतज्ञ आहे, अशी भावना व्यक्त केली आहे. भारतीय लष्कर हे निर्धार,व्यावसायिकता आणि समर्पणाचं प्रतीक आहे, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लष्कराचा गौरव केला आहे.आपल्या सीमांचं रक्षण करण्यासोबतच भारतीय लष्करानं नैसर्गिक संकटांच्या काळात नागरिकांना मदत करत अत्यंत मोलाची भूमिका बजावली आहे, असं सांगत,भारतीय लष्करातल्या कर्मचा-यांचं

आणि त्यांच्या कुटुंबांचं कल्याण, यासाठी आपलं सरकार प्रतिबद्ध आहे, असं पंतप्रधानांनी आपल्या याबाबतच्या संदेशात म्हटलं आहे.
या दिनाच्या निमित्तानं आज पुण्यामध्ये राज्याचा मुख्य संचलन सोहळा होत आहे.
`राष्ट्ररक्षा` हेच सर्वोच्च ध्येय मानून, आपले सर्वस्व त्यागून लढणाऱ्या भारतीय सैनिकांच्या शौर्याला आणि त्यांच्या कुटुंबांच्या समर्पणाला वंदन,अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

****

मकर संक्रांतीच्या पुण्य पर्व काळात प्रयागराज इथं आयोजित महाकुंभमेळ्यात आतापर्यंत सुमारे साडेतीन कोटी लोकांनी अमृत स्नान केलं आहे. दरम्यान, जगातल्या सर्वात भव्य अशा या आध्यात्मिक सोहळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत असून, प्रतिबंधित क्षेत्रात बळजबरीनं प्रवेश करणा-या नऊ ड्रोन्सना निष्क्रीय करण्यात आल्याचं वृत्त आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या उपस्थितीत होत आहे. यावेळी यंदाचा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ लेखिका, नाटककार, निर्मात्या सई परांजपे यांना प्रदान करण्यात येत आहे. या उद्घाटन सोहळ्याआधी भारतीय सिनेसृष्टीचे संस्थापक दादासाहेब फाळके यांनी १०५ वर्षांपूर्वी दिग्दर्शित केलेला प्रसिद्ध मूकपट कालियामर्दन चं विशेष प्रदर्शन होणार आहे, तर रात्री नऊ वाजता आयनॉक्स, प्रोझोन मॉल इथं लिटील जाफना या चित्रपटानं या महोत्सवाचा शुभारंभ होणार आहे.

****

महापारेषणच्या ऐरोली इथल्या राज्य भार प्रेषण केंद्राला देशातलं सर्वोत्कृष्ट भार प्रेषण केंद्र  आणि ओपन ऍक्सेस, या दोन राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवण्यात आलं आहे. विजेच्या उपलब्धतेनुसार पुरवठा आणि त्याचं नियंत्रण करण्यासाठी नावीन्यपूर्ण योजनांची यशस्वी अंमलबजावणी केल्याबद्दल या केंद्राला हे पुरस्कार मिळाले आहेत. इंडिपेंडेन्ट पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन ऑफ इंडिया या राष्ट्रीय संस्थेनं देशभरातल्या विद्युत कंपन्यांच्या कामगिरीचं मूल्यमापन करून हे पुरस्कार दिले आहेत.

****

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यात एक लाख २० हजार पात्र लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी पूर्ण झाली आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांनी ही माहिती दिली. ऑनलाइन नोंदणी झालेल्या पात्र लाभार्थ्यांना लवकरच उद्दिष्टानुसार मंजुरी देण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडुंनी विजयी सुरुवात केली. महिला एकेरीत पी व्ही सिंधु, पुरुष एकेरीत किरण जॉर्ज, पुरुष दुहेरीत सात्विक साईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांच्या जोडीने, तर मिश्र दुहेरीत ध्रूव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांच्या जोडीने विजय मिळवत पुढच्या फेरीत प्रवेश केला.

****